# महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्र. - 02462-244474, 234504
फॅक्स क्र. - 02462-235103

नियंत्रण कक्ष क्र. - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

---

जा.क्रं./ प्रेस नोट/222/पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड / 2024 / दिनांक : 26/06/2024

---

## 1)जबरी चोरी :—

**1)नांदेड ग्रामीण** :—दिनांक 24.06.2024 रोजी चे 08.30 वा. चे सुमारास, **मोदी ग्राऊंड टि पॉईट नांदेड येथे**, यातील फिर्यादी व त्यांचा मित्र मोदी ग्राऊंड जवळील टी पॉईंट येथे मोटार सायकल लावुन पायी वॉकींग करीत असतांना यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी व त्यांचे मित्र यास खंजरचा धाक दाखवुन फिर्यादीची पॅशन प्रो कंपणीची मोटार सायकल क्रमांक एमएच–26/एव्ही–2093 किंमती 60,000/–रू ची जबरीने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी विक्रम जळबाजी वानखेडे, वय 32 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. बेटसांगवी ता. लोहा ह. मु. भगतसिंग चौक ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 515/2024 कलम 392, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री गायकवाड, मो. नं. 9067510100** हे करीत आहेत.

**2)हिमायतनगर** :—दिनांक 21.06.2024 रोजी चे 18.00 वा. चे सुमारास, **बैल बाजार शेडमध्ये हिमायतनगर ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे**, यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीच्या खिशातील रेडमी कंपणीचा मोबाईल किंमती 10,500/–रू चा जबरदस्तीने हिसकावुन चोरून नेला. व चोरीचा माल बाळगला. वगैरे **फिर्यादी आरविंद मारोती सावंतने, वय 33 वर्षे, व्यवसाय शिक्षक रा. बोरी पोस्ट चातरी ता. उमरखेड जि. यवतमाळ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 142/2024 कलम 392, 411, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास मपोउपनि/श्रीमती कदम, मो. नं. 9922660412** हे करीत आहेत.

## 2)घरफोडी :—

**1)मुखेड** :— दिनांक 25.06.2024 रोजी चे 01.30 वा. चे सुमारास, **मौ. पाळा ता. मुखेड नांदेड येथे**, यातील फिर्यादी हा त्याचे कुटूंबासह स्लॅपवर झोपला असता कोणीतरी अज्ञात चार चोरटयांनी घरात घुसून लोखंडी कपाट तोडुन सोन्याची अंगठी किंमती 10,000/–रू ची व मनी मंगळसुत्राची पोत दहा ग्रामची किंमती 20,000/–रू ची व नगदी 12,000/–रू असे एकुण 42,000/–रू चा ऐवज चोरून नेला. तसेच शेजारील साक्षीदार लोकांच्या घरी पण चोरी झाली आहे. वगैरे **फिर्यादी नागनाथ बापुराव पाटील, वय 43 वर्षे, व्यवसाय शेती रा. पाळा ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 195/2024 कलम 457, 380, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/400 धोंडगे, मो. नं. 9923187434** हे करीत आहेत.

## 3)मो.सा.चोरी :—

**शिवाजीनगर** :— दिनांक 22.06.2024 रोजी चे रात्री 23.00 ते दिनांक 23.06.2024 चे 07.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरासमोर विष्णुनगर नांदेड येथे**, यातील फिर्यादीची हिरो कंपनीची मोटार सायकलक्रं. एमएच.–26/बीवाय–8079 किंमती 50,000/–रूपयाची घरा समोर पार्कीग करून झोपला असता नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी अक्षय अनिलसिंह ठाकुर, वय 28 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. विष्णुनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 215/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/43 पाटील, मो.नं. 8805013616** हे करीत आहेत.

## 4)विवाहीतेचा छळ :–

**वजिराबाद :–** दिनांक 28.01.2024 पासुन ते आज पावेतो, **तहुराबाग वाघी रोड नांदेड येथे**, यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस शारिरीक व माणसीक त्रास देवुन माहेरी पाठविले व पाच लाख रूपये द्या किंवा नांदेडमध्ये प्लॉट घेवुन द्या तरच नांदवितो असे म्हणुन सतत त्रास देत आहेत. वगैरे **फिर्यादी 20 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 289/2024 कलम 498(अ), 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1742 खानसोळे, मो.क्रं. 9823101742** हे करीत आहेत.

## 5)प्राण्यांना क्रुरतेने वागणुक :–

**देगलुर :–** दिनांक 25.06.2024 रोजी चे 16.30 वा. चे सुमारास, **तडखेल खानापुर रोडवर एकलारा रोड चौकात खानापुर ता. देगलुर जि. नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररीत्या आपले बोलेरो पिकअप क्रमांक एमएच–26/बीई–9028 मध्ये म्हशीचे लहान 23 हल्ले दाटीवाटी कोंबुन जनावरांची कत्तल करण्यासाठी अवैद्य वाहतुक करून घेवून जात असतांना असताना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/142 भारत खंडु खंताडे, ने. पोस्टे देगलुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरन 271/2024 कलम 11(1)(घ),11,(1)(1), प्राण्यांना क्रुरतेने वागणुक अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री मामिडवार, मो.क्रं. 9923692462** हे करीत आहेत.

## 5)जुगार :–

**1)वजिराबाद :–**दिनांक 25.06.2024 रोजी चे 13.45 वा. चे सुमारास, **वजिराबाद हाद्यीतील जिजामाता हॉस्पीटलच्या पुढील गल्लीत मोकळया जागेत नांदेड येथे**, यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या टाईम बाजार नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 3280/–रुपये व जुगाराचे साहीत्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/श्री माधव नामदेव केंद्रे, ने. स्थागुशा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 290/2024 कलम 12(अ) म.जु.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1962 लोखंडे, मो.नं. 7745001962** हे करीत आहेत.

**2)भाग्यनगर :–**दिनांक 25.06.2024 रोजी चे 13.00 वा. चे सुमारास, **आरएमआर कॉम्पलेक्स नांदेड बार समोर छत्रपती चौक रोडवर नांदेड येथे**, यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या मिलन डे नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 2180/–रुपये व जुगाराचे साहीत्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/1138 बालाजी दत्तात्रय तेलंग, ने. स्थागुशा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 271/2024 कलम 12(अ) म.जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2309 जाधव, मो.नं. 9049343095** हे करीत आहेत.

## 6)प्रोव्हिबीशन :–

**1)भाग्यनगर :–** दिनांक 25.06.2024 रोजी चे 14.35 वा. चे सुमारास, **अभिलाषा वाटर प्लॉन्ट समोर सार्वजनिक रोडवर बेलानगर नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 1400/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/818 प्रदीप संभाजी वाघमारे, ने. पोस्टे भाग्यनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 270/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/51 जाधव, मो.नं. 9067952076** हे करीत आहेत.

**2)मुदखेड :–** दिनांक 25.06.2024 रोजी चे 20.15 वा. चे सुमारास, **पिंपळकौठा चोर शिवारातील कॅनॉलजवळ नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या हातभटटीची गावठी दारू किंमती 4000/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/2608 शेख मकसुद शेख गौसोदिन, ने. पोस्टे मुदखेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 107/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2232 पवार, मो.नं. 7776088897** हे करीत आहेत.

## 7)विषारी औषध पिऊन आत्महत्या :–

**तामसा :–**दिनांक 19.06.2024 रोजी चे 20.00 चे सुमारास, **ग्रामीण रूग्णालय सरकारी दवाखाना भोकर ता. भोकर जि. नांदेड येथे**, यातील **मयत नामे उत्तम यमुनाजी जंगेवाड, वय 45 वर्षे, व्यवसाय शेती रा. कांडली बु. ता. हिमायतनगर जि. नांदेड**, यांनी सततची नापीकी व बँकेचे कर्ज कसे फेडावे या ताणतणावातुन दारूच्या नशेत कोणतेतरी विषारी औषध पिऊन आत्महत्या केला. वगैरे **खबर देणार यमुनाजी उत्तम जंगेवाड, वय 30 वर्षे व्यवसाय शेती रा. कांडली बु. ता. हिमायतनगर जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे तामसा** आ. मृ. 14/2024 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री डुडूळे, मो.नं. 9022037761** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

<u>पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड   जा.क्र.   223/2024      दिनांक : 26.06.2024</u>

पोलीस अधिक्षक कार्यालयात **"राजर्षि शाहु महाराज "** यांची जयंती साजरी केली. आणि **अंमली पदार्थ विरोधी दिनाची शपथ** घेण्यात आली.

आज 26 जुन, 2024 रोजी बुधवार या दिवशी **"राजर्षि शाहु महाराज"** या थोर पुरूषांची जयंती पोलीस अधिक्षक कार्यालयात साजरी करण्यात आली. तसेच 26 जुन हा अंमली पदार्थ विरोधी दिन असल्याने अंमली पदार्थ विरोधी दिनाची शपथ घेण्यात आली. **मा. श्री.श्रीकृष्ण कोकाटे,** पोलीस अधिक्षक नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली **मा. जगदीश भंडरवार**, पोलीस निरीक्षक, आर्थीक गुन्हे शाखा, यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. आणि अंमली पदार्थ विरोधी दिनाची शपथेचे सामुहीक वाचन करण्यात आले. **मा. श्री उदय खंडेराय**, पोनि स्थागुशा यांचे नेत्रत्वखाली, **श्री साईनाथ पुयड,** पोउपनि स्थागुशा, यांनी अंमली पदार्थ विरोधी दिनाचे शपथेचे सामुहीक वाचन केले. या प्रसंगी **श्री त्रिलोचनसिंग सोहल,** पोउपनि नियंत्रण कक्ष, पोलीस कल्याण विभाग, तसेच एलसीबी, जिवीशा, आणि पोलीस अधिक्षक कार्यालयातील सर्व विभागाचे पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार व मंत्रालयीन कर्मचारी मोठया संख्येने हजर होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन, सपोउिपनि/सुर्यभान कागणे, पोहेकॉ/संजय सांगवीकर, यांनी उत्तमरित्या केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड




OPPO Reno5 Pro 5G